चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र
कार्यालय पोलीस अधीक्षक, चंद्रपूर

Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

२० मार्च, २०१९

☎ : 07172-264300
: 07172-255800
✍: 7276494810 (PRO)

# होळीच्या पार्श्वभुमीवर जिल्हात विविध ठिकाणी अवैध दारू आणि जुगारावर कार्यवाही

दिनांक १९/०३/२०१९ रोजी होळी सणाच्या पार्श्वभुमिवर जिल्हयातील विविध पोलीस स्टेशन अंतर्गत नाकेबंदी आणि छापे टाकुन अवैध दारूचा साठा तसेच जुगार अडयावर कार्यवाही करण्यात आली.

यामध्ये जिल्हयातील पोलीस स्टेशन **चंद्रपुर शहर, रामनगर, बल्लारशाह, घुग्घुस, दुर्गापुर, वरोरा, भद्रावती, शेंगाव, भद्रावती, माजरी, ब्रम्हपुरी, भिसी, चिमुर, तळोधी, मुल, पाथरी, राजुरा, विरूर** अंतर्गत संबधीत पोलीस पथकाने प्रभावी कार्यवाही करीत दारू तस्करी आणि विक्री करणाऱ्याच्या विरूध्द जिल्हयात एकुण **४५** गुन्हयाची नोंद करण्यात आली असुन ११ आरोपीतांना अटक करण्यात आले आहे. सदर गुन्हयात एकुण **६,६१,९७५/—रू.** चा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. पुढिल तपास संबंधीत पोलीस स्टेशन करीत आहे.

तसेच **पोलीस स्टेशन पिटट्रीगुडा** अंतर्गत झालीगुडा बसस्टॉप येथे नाकेबंदी लावुन वाहनांची तपासणी सुरू असतांना एका संशयीत वाहनाची झडती घेतली असता वाहनामध्ये ५६ पेटया रिझोम विस्की किं. ४,०३,२००/— रू आणि पिकअप बोलेरो वाहन क्र. टीएस २२ टी ३०५७ किं. ४,००,०००/—रू असा एकुण ८,०३,२००/—रू माल हस्तगत करण्यात आला आहे. सदरचा गुन्हा पोलीस स्टेशन पिटट्रीगुडा येथे नोंद करण्यात आला असुन एका आरोपीस अटक करण्यात आली आहे.

सदरची कार्यवाही पोलीस अधीक्षक चंद्रपुर श्री. महेश्वर रेडड्ी यांचे मार्गदर्शनात उपविभागीय पोलीस अधिकारी गडचांदुर श्री. विलास यामावार यांचे नेतृत्वात पिटट्रीगुडा पोस्टे प्रभारी सपोनि श्री. आळंदे यांचे सह पोलीस स्टेशन पथक यांनी पार पाडली.

## तसेच चंद्रपर पोलीसांची जुगार अडयावरील कार्यवाही पुढिलप्रमाणे

**पोलीस स्टेशन बल्लारशाह** अंतर्गत बालाजी वार्ड येथे ०१ आरोपी ईसम हा सार्वजनिक ठिकाणी ५२ ताश पत्यावर पैशाची बाजी लावुन हारजीतचा जुगाराचा खेळ खेळताना मिळुन आल्याने पो.स्टे. **बल्लारशाह** येथे अप. क्र. **२८७/२०१९** कलम १२ (अ) मुंबई जुगार कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयात घटनास्थळावरून

☎ : 07172-264300
: 07172-255800
Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in
: 7276494810 (PRO)

जुगारच्या साहीत्यसह नगदी असा एकुण **२,७१०/—रू.** चा माल हस्तगत करण्यात आला आहे.

**पोलीस स्टेशन गडचांदुर** अंतर्गत येथे ०१ आरोपी ईसम हा सट्टापट्टीच्या आकडयावर पैशाची बाजी लावुन हारजीतचा जुगाराचा खेळ खेळताना मिळुन आल्याने पो. स्टे. **गडचांदुर** येथे अप. क्र. **९४/२०१९** कलम १२ (अ) मुंबई जुगार कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयातील ०१ आरोपीस अटक करण्यात आले असुन घटनास्थळावरून जुगारच्या साहीत्यसह नगदी असा एकुण **१,०२०/—रू.** चा माल हस्तगत करण्यात आला आहे.

**पोलीस स्टेशन दुर्गापुर** अंतर्गत ०१ आरोपी ईसम हा सट्टापट्टीच्या आकडयावर पैशाची बाजी लावुन हारजीतचा जुगाराचा खेळ खेळताना मिळुन आल्याने पो.स्टे. **दुर्गापुर** येथे अप. क्र. **८०/२०१९** कलम १२ (अ) मुंबई जुगार कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयातील ०१ आरोपीस अटक करण्यात आले असुन घटनास्थळावरून जुगारच्या साहीत्यसह नगदी असा एकुण **१,७३५/—रू.** चा माल हस्तगत करण्यात आला आहे.

**पोलीस स्टेशन गडचांदुर** अंतर्गत येथे ०३ आरोपी ईसम हे ५२ ताश पत्यावर पैशाची बाजी लावुन हारजीतचा जुगाराचा खेळ खेळताना मिळुन आल्याने पो.स्टे. **गडचांदुर** येथे अप. क्र. **९३/२०१९** कलम १२ (अ) मुंबई जुगार कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयातील ०३ आरोपीस अटक करण्यात आले असुन घटनास्थळावरून जुगारच्या साहीत्यसह नगदी असा एकुण **२,६००/—रू.** चा माल हस्तगत करण्यात आला आहे.

———————————————————————————————————————